**वाचले :-**

१. महाराष्ट्र महानगरपालिका [ स्थानिक संस्था कर ] नियम २०१०

२. महाराष्ट्र शासन , नगरविकास विभाग दिनांक २५ मार्च २०१० ची अधिसूचना

३. महाराष्ट्र शासन , नगरविकास विभाग दिनांक २० जून २०१३ ची अधिसूचना

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
स्थानिक संस्था कर विभाग
क्र. स्थासंक/८/कावि/ ६८० /२०१३
दिनांक :-२५/७/२०१३

**विषय :- महाराष्ट्र महानगरपालिका [ स्थानिक संस्था कर ] नियम २०१० मधील नियम २८ व ३२ बाबत करावयाची कार्यपध्दती.**

**आदेश ,**

दिनांक १ एप्रिल २०१३ पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये स्थानिक संस्था कराची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका [ स्थानिक संस्था कर ] नियम २०१० मधील नियम २८ व नियम ३२ बाबत कार्यपध्दती सुलभ होण्याच्या दृष्टीने स्थायी आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता असल्यामुळे मी डॉ. श्रीकर परदेशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**१. नियम २८ [४] :- प्रक्रीयेसाठी आयात होणा-या मालावर अनामत भरणे, परतावा घेणे , स्थायी स्वरुपाची ठेव ठेवणे यासंबंधी कार्यपध्दती -**

**अ] स्थायी स्वरुपाची ठेव ठेवणे :-** शहरातील कोणताही व्यापारी नियमित तत्वावर प्रकिया करण्यासाठी शहरामध्ये शहराबाहेरुन माल आयात करुन त्यावर प्रकिया करुन [ ज्या प्रकियेचा समावेश आहे अशी प्रक्रिया ] सहा महिन्याच्या आत मूळ मालकाला परत पाठवितात अशा व्यापा-याने मा. आयुक्त यांच्याकडे स्थायी स्वरुपाची ठेव रक्कम भरण्यासाठी अर्ज केल्यास अशा व्यावसायिकाकडून पुढील प्रमाणे कागदपत्रांची मागणी करावी.

१. जकात चालू होती त्यावेळी आयातकाने तीन महिन्याच्या कालावधीमध्ये प्रक्रिया करण्यासाठी आयात केलेल्या मालासाठी सलगचे तीन महिन्यामध्ये जमा केलेल्या डिपॉझिट रकमेची माहिती अर्जदाराकडून घेण्यात यावी.

२. स्थायी स्वरुपाची ठेव ठेवणेकामी असा अर्ज सादर केल्यानंतर त्याची तपासणी करुन सलग तीन महिन्याचे जमा केलेल्या डिपॉझिट रकमेची सरासरी काढून एक महिन्याचे सरासरी इतकी रक्कम संबंधित व्यापारी / व्यावसायिकडून स्थायी स्वरुपाची ठेव म्हणून भरुन घेण्याबाबत मा. आयुक्त यांच्या मान्यतेने कार्यवाही करणेत यावी. त्यामुळे प्रक्रियेसाठी आयात होणा-या मालावर व्यावसायिकाकडून वारंवार अनामत रक्कम भरुन घेण्याची गरज पडणार नाही. याबाबतचे सर्व रेकॉर्ड आयातकाने जतन करुन ठेवावे . ज्यावेळी संबंधित व्यापारी यांचेकडे कागदपत्रांची मागणी करणेत येईल त्यावेळी सर्व रेकॉर्ड तपासणीकामी या नियमामध्ये नमुद केलेल्या कालावधीकरीता स्थानिक संस्था कर विभागाकडे सादर करणे संबधित व्यावसायिकावर बंधनकारक राहील.

३. स्थानिक संस्था कर लागू झाल्यानंतर जर एखाद्या व्यापारी / व्यावसायिकाने नवीन व्यवसाय सुरू केला असेल आणि जर अशा व्यापा-यास / व्यावसायिकास स्थायी स्वरुपाची ठेव ठेवण्याची सवलत घ्यावयाची असेल तर अशा व्यापारी / व्यावसायिकाने सलगचे तीन महिन्याचे कालावधीमधील भरलेल्या स्थानिक संस्था कराबाबतची कागदपत्रे सादर करुन स्थायी स्वरुपाची ठेव ठेवण्यासाठी अर्ज करता येईल.

४. भविष्यात व्यापारी/व्यावसायीक यांच्या व्यापाराची उलाढाल वाढलेस वाढलेल्या उलाढीलीनुसार वाढीव स्थायी स्वरुपाची ठेव ठेवावी लागेल.

**ब] अनामत परतावा :-**

शहरातील कोणताही व्यापारी प्रक्रिया करण्यासाठी शहराबाहेरुन माल आयात करीत असेल व अशा व्यापा-याने स्थायी रक्कम अनामत म्हणून महानगरपालिकेकडे जमा केलेली नसेल अशा व्यापा-याने दरवेळी अनामत रक्कमं भरणे बंधनकारक आहे. नियम २८ [४] ला अधीन राहून त्यांनी परताव्यासाठी अर्ज केल्यानंतर परताव्याबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. आयात केल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत आयात केलेला माल मूळ मालकास परत केलेला आहे किंवा नाही याची खात्री एक्साईज ४, (५) (अ) चलन, मालाच्या आवक नोंद वहीतील नोंदीची छायांकित प्रत, प्रक्रिया केल्यानंतर मजुरी आकारले बाबतची देयके, व त्याचे जावक चलन याची शहानिशा करावी. तसेच अशा आयातकाकडून सदर मालावर प्रक्रिया करुन त्यामध्ये कसलाही बदल न करता तो माल मूळ मालकास परत पाठविला आहे असा दाखला घेण्यात यावा. त्याचप्रमाणे सदर माल हा मूळ मालकास पोहचल्याबाबत आवक नोंद वहीमधील आवक क्रमांक व कंपनीचे सही शिक्यानिशी असल्याबाबतची पोहोच घेण्यात यावी.

२. प्रक्रिया केलेला माल मूळ मालकाच्या पाठविल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत परताव्यासाठी अर्ज करावा, त्यानंतर आलेल्या अर्जाचा परतावा दिला जाणार नाही.

नियम २८ [ ४ ] मधील कोणत्याही तरतुदींचेउल्लंघन झाल्यास अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

**२ नियम ३२ :- निर्यातीच्या बाबतीत स्थानिक संस्था कराचा परतावा संबधी कार्यपध्दती**

**अ] ९० % परतावा :-** शहरातील व्यापारी / व्यावसायिक विक्री करारानुसार असेल त्या व्यातिरिक्त अन्य प्रकारे कोणत्याही मालाची निर्यात करणारी व्यक्ती शहरामध्ये शहराबाहेरुन माल आयात करीत असेल आणि अशा आयात केलेल्या मालावर नियमाप्रमाणे स्थानिक संस्था कर भरलेला असेल आणि जर असा माल ६ महिन्याच्या आत शहराबाहेर विक्री/ निर्यात केला असेल तर अशा मालावर भरलेल्या स्थानिक संस्था कराच्या रकमेपैकी ९० % रक्कम या नियमास अधिन राहून पुढील कार्यपध्दती अवलंबून परत करता येईल.

१ स्थानिक संस्था कर परताव्यासाठी लेखी अर्ज करावा. अर्जासोबत माल आयातीबाबत माल आवक रजिस्टर नोंद वहीतील अशा नोंदीची छायांकित प्रत, माल खरेदी व विक्री/निर्यात केलेबाबत पक्की बिले / देयके, माल जसेच्या तसा सहा महिन्याचे आत निर्यात केलेबाबतचा दाखला, परचेस ऑर्डर दिलेली असल्यास त्याची छायांकित प्रत, संबधीतास माल प्राप्त झालेची पोहोच ही कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

२ अशा प्रकारे शहराबाहेर विक्री / निर्यात केलेल्या मालाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत आयातकाने ९० % परताव्यासाठी अर्ज करावा. त्यानंतर आलेल्या अर्जाचा परताव्यासाठी विचार केला जाणार नाही.

**ब] १० % रक्कम भरण्यास परवानगी देणे :-**

नियम ३२ [ड] मधील तरतुदीनुसार एखादा व्यापारी / व्यावसायिक अनुसूची क मध्ये नमुद केलेल्या मालाची आयात व निर्यात नियमितरित्या करीत असेल अशा व्यापा-याने हमीपत्र दाखल केलेनंतर मा. आयुक्त यांनी त्यास मान्यता दिलेनंतर फक्त १० % रक्कम भरुन घेण्याची परवानगी देण्यात येईल. परंतु या तरतुदीचा फायदा फक्त अशा व्यापा-यांस मिळेल की जे व्यापारी शहराबाहेरुन माल शहरामध्ये आणतात आणि तो माल १०० % शहराबाहेर विक्री / निर्यात करतात.

**क] सेट ऑफ ची परवानगी देणे :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय यांचेकडील दिनांक २० जून २०१३ चे अधिसूचनेमध्ये नमुद केलेनुसार नियम ३२ [ १ ] मधील तरतुदीनुसार जर एखाद्या व्यापारी / व्यावसायिकाने मालाची आयात / निर्यात एकाच कॅलेंडर महिन्यात केलेली असेल आणि त्यावर नियमाप्रमाणे स्थानिक संस्था कर भरलेला

असेल आणि त्याचे योग्य ते पुरावे सादर केले असतील तर अशा व्यापा-यास पुढील कॅलेंडर महिन्यात त्या व्यापा-यास सेट ऑफ ची परवानगी देण्यात येईल. त्यासाठी संबंधित व्यापारी / व्यावसायिकाने पुढील प्रमाणे कागदपत्रे दाखल करणे बंधनकारक राहील.

१ खरेदी केलेल्या मालाचे पक्के बिल.

२ तो माल शहराबाहेर त्याच महिन्यामध्ये विकला असल्याबाबतचे पक्के बिल

३ जर अशा मालाच्या खरेदीची ऑर्डर असेल तर त्या ऑर्डरची छायांकित प्रत.

उपरोक्त प्रमाणे स्थानिक संस्था कर विषयक कार्यपध्दतीची अंमलबजावणी करणेची कार्यवाही करणेत यावी.

(डॉ. श्रीकर परदेशी)
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११०१८**

**प्रत :- सर्व संबंधित**